**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २२३** **दिनांक :- २१/०८/२०२१**

## खंडणीसाठी अपहरण करणा-या ५ आरोपीतांना अटक-नवघर पोलीस स्टेशनची कामगिरी.

श्री. समीर पांडूरंग सकपाळ, रा. शिवशक्ती कॉम्प्लेक्स, तलाव रोड, भाईंदर पूर्व यांनी दिनांक-१५/८/२०२१ रोजी तक्रार दिली की, 'फियादी हे दिनांक १४/८/२०२१ रोजी २०.३० वा. चे सुमारास अशोक भवन बिल्डींग बी. पी. रोड, भाजी मार्केट, भाईंदर पूर्व येथे असतांना त्याठिकाणी एका वॉल्स वॅगन कारमधुन ४ इसम येऊन त्यांनी तक्रारदार व त्याचे ओळखीचा बंटी यांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून त्यांचे अपहरण करुन सुनसान ठिकाणी नेऊन, त्यांना बंदुकीचा धाक दाखवुन 'कारमधील इसम हे क्राईम ब्रँचचे पोलीस आहेत, तुझी एन्काऊंटरची ऑर्डर निघाली आहे' असे सांगुन मांडवली करीता फिर्यादीकडे १२ लाख रुपयांची खंडणीची मागणी करुन फिर्यादीचे शर्ट व पॅन्टचे खिशातील ५०,०००/- रु. रोख रक्कम व १५,०००/-रुपये किंमतीचे गळयातील सोन्याचे लॉकेट जबरदस्तीने काढुन घेतले. त्यानंतर पुन्हा फिर्यादीचे डोक्याचे डावे बाजुस बंदुक लावुन जीवेठार मारण्याची धमकी देऊन, आणखी पैशाची मागणी केली व ते पैसे देणेकरीता फिर्यादीचा मित्र हे घेऊन आले असता पोलीस आले असावे या भितीने आरोपींनी फिर्यादी व त्याचे सोबतचा बंटी यांस पुन्हा कारमधुन पळवुन नेऊन एका सुनसान ठिकाणी आणुन तेथे फिर्यादीचा मोबाईल जबरदस्तीने काढुन घेऊन त्यांना सुनसान ठिकाणी सोडून देऊन आरोपी निघुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पो.ठाणे येथे गुरनं. I ५६४/२०२१ भा दं वि सं. कलम-३६४(अ), ३८६, ३९७, १७०, १२०(ब), ३४ सह आर्म ॲक्ट कलम-३, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला होता.

सदर बाबत गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल झालेनंतर तात्काळ वरिष्ठांना माहिती देऊन त्यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे तपास सुरु करण्यात आला होता. सदरचा गुन्हा करणारे आरोपी यांनी गुन्हा करतांना कोणताही पुरावा मागे सोडलेला नव्हता त्यामुळे तपास करणे जिकरीचे झाले होते. तपास सुरु केले नंतर खास तपास पथके तयार करुन त्यांचे करवी तांत्रीक माहिती व बातमीदार यांचेकडून माहिती गोळा करणेचे काम सुरु केले. दरम्यान तांत्रीक व बातमीदार यांचे माहितीचे आधारे गुन्हा करणारे आरोपीचा सुगावा लागला. त्याप्रमाणे तपास पथक यांनी कौशल्यपूर्ण तपास करुन गुन्हयात एकूण ०९ आरोपी निष्पन्न करुन पैकी ०७ आरोपी यांना अटक केली. त्यांचेकडे तपास केला असता त्यातील एकजण पोलीस व ०१ आरोपी स्थानिक पत्रकार असल्याचे निष्पन्न झालेले आहे. अटक आरोपींकडे तपास करुन त्यांचेकडून गुन्हा करतांना वापरलेले वाहन कार, पोलीस पाटी, बेडी व इतर साहित्य हस्तगत करणेत आले आहे. अटक आरोपी हे सध्या पोलीस कोठडी रिमांडमध्ये आहेत.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो. आयुक्त, भाईंदर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पो.नि. प्रकाश मासाळ, सपोनि. योगेश काळे, सपोनि. भास्कर पुल्ली, सपोनि. गणेश केकाण, पोउपनि. संदिप ओहोळ, पोना. रविंद्र भालेराव, पोना. ऐनुद्दीन शेख, पोशि. युनुस गिरगांवकर, पोशि. संदीप जाधव, पोशि. पाटील यांनी केली आहे.